पाहिजेत
सुटाळा बु. येथे स्थित
महा ई सेवा केंद्रावर
काम करण्यासाठी
ऑनलाईन कामाचा अनुभव असलेले मुले -मुली पाहिजते
संपर्क -9422180819

RNI NO : MAHMAR/2022/84546
Postal No : BLD/228/2023-25
साप्ताहिक
# पब्लिक कॉन्टॅक्ट
9422180819 publiccontact2022@gmail.com PUBLIC CONTACT | मुख्य संपादक : गजानन राऊत | कार्यकारी संपादक : श्याम राऊत
| वर्ष ५ वे | अंक १९३ वा | गुरुवार दि. १५ जानेवारी २०२६ ते २१ जानेवारी २०२६ | किंमत ५ रुपये | पृष्ठे ८

# मक्याच्या बोगस बियाण्यांमुळे ५० एकरातील पिकाला फटका

**खामगाव :** तालुक्यातील पोरज येथे बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. मक्याचे बियाणे निकृष्ट निघाल्याने कणसात दाणेच न भरल्याचा गंभीर आरोप, संबंधित शेतकऱ्यांनी केला आहे. या प्रकारामुळे सुमारे ५० एकर क्षेत्रावरील पिकाचे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांना लाखो रुपयांचा फटका बसल्याचा दावा करण्यात आला आहे. याप्रकरणी संबंधित शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे तक्रार दाखल केली आहे.

पोरज येथील काही शेतकऱ्यांनी खरीप हंगामात एका खासगी कंपनीचे मक्याचे बियाणे खरेदी करून सुमारे ५० एकर क्षेत्रावर पेरणी केली होती; मात्र पीक तयार होऊनही कणसात दाणे न भरल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

परिणामी संपूर्ण पीक उत्पादनाविना राहिले असून, शेतकऱ्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. अधिक उत्पादनाच्या अपेक्षेने शेतकऱ्यांनी महागडे बियाणे खरेदी करून पेरणी केली होती.


मात्र बियाणे बोगस ठरल्याने



त्यांच्या पदरी निराशा पडली आहे. या घटनेनंतर संबंधित कंपनीकडून पंचनामा करण्यात आला. या प्रकाराबाबत माहिती देत शेतकऱ्यांनी संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे तक्रार केली असता, सुरुवातीला नुकसानभरपाई देण्याचे आश्वासन देण्यात आले होते; मात्र अद्याप कंपनीकडून कोणतीही भरपाई मिळालेली नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित कंपनीवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. या शेतकऱ्यांनी केली तक्रार या गंभीर प्रकाराबाबत पोरज येथील शेतकरी संदीप राजाराम हेरोडे, देवेंद्र श्यामराव इंगळे, विजय रामेश्वर बोराडे, प्रदीप राजाराम हेरोडे, नीलेश श्यामराव वाकोडे, उमेश श्यामराव वाकोडे, कडूबा बळीराम शेगोकार, श्यामराव मनू सकळकळे, अभय भगवानसिंग बोराडे, चतरसिंग मोहनसिंग बोराडे, शरद तेजराजसिंग बोराडे व संजय रामभाऊ सकळकळे यांनी तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली आहे.

>> या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येईल. त्यानंतर पुढील कारवाईबाबतचा अहवाल वरिष्ठांकडे सादर करण्यात येईल.
– **सुनील पवार,** तालुका कृषी अधिकारी,



## संपादकीय

# रवी हवा राजेंद्र हवा

तमिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी आणि केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर या दोन महामहिमांचे कौतुक करावे तितके कमीच. आपापल्या विधानसभांची अधिवेशने सुरू होत असताना द्यावयाच्या अभिभाषणात या दोघांनी खोडा काढला. सामान्य राजकारणी (खरे तर राजकारणी सामान्य असूच शकत नाही.) देतात ते भाषण आणि राज्यपाल देतात ते अभिभाषण. राज्यांच्या विधानसभांची वर्षातील पहिली अधिवेशने जेव्हा सुरू होतात तेव्हा त्या अधिवेशना राज्यपालांनी संबोधण्याची प्रथा राज्यघटनेच्या अनुच्छेद १७५ नुसार कायम आहे. या भाषणा अभिभाषण असे म्हणतात. नवे सरकार आल्यानंतरच्या पहिल्या, किंवा नवीन विधानसभा गठित झाल्यावर पहिल्या अधिवेशनातही हे अभिभाषण होते. सर्वसाधारण प्रथा अशी की भाषण जरी राज्यपाल करीत असले तरी ते प्राय: मंत्रिमंडळाने लिहिलेले, मंजूर केलेले असते. राज्यपालांनी फक्त ते वाचायचे. जी बाब राज्यपालांबाबत, तीच बाब संसदेसमोर अभिभाषण करणाऱ्या राष्ट्रपतींसही लागू होते.

राष्ट्रपतीही संसदेस संबोधित करतात. त्यांचेही भाषण केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूर केलेले असते. हे मंत्रिमंडळाचेच भाषण असल्याने राष्ट्रपती वा राज्यपाल सरकारने गतसाली नोंदवलेली कामगिरी, आगामी आव्हाने याबाबत त्यात सविस्तरपणे बोलतात. सरकारने यंव केले आणि आता ते त्यंव करणार वगैरे. या प्रथेचे मूळ आहे ते ब्रिटिश व्हाइसरॉय या पदात. त्या वेळी राष्ट्रकुलात सरकार कोणाचेही असो, पण व्हाइसरॉय हा ग्रेट ब्रिटनच्या राणीचे प्रतिनिधित्व करत असे. त्यामुळे त्याच्या भाषणात 'माझे सरकार' असा उल्लेख असे. महामहीम रवी आणि राजेंद्र यांचे कौतुक अशासाठी की त्यांनी ही ब्रिटिश परंपरा मोडीत काढली. साहेब मागे सोडून गेलेल्या सर्व प्रथा गंगार्पणमस्तु करण्याचा महामंत्र खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेला आहे. समग्र स्वयंसेवकांनी त्या कार्यास स्वत:स झोकून दिलेले आहे. तेव्हा राज्यपाल कसे मागे राहतील? सर्व महामहिमांनी आदर्श घ्यावा असे कृत्य या दोघांनी केलेले असल्यामुळे त्यांचे जाहीर कौतुक आवश्यक.

या रवी यांनी मुख्यमंत्री स्टालिन यांनी दिलेले भाषण वाचण्याचे साफ नाकारले. इतकेच नव्हे तर आपला पोलिसी बाणा जागवत त्यांनी विधिमंडळातून सभात्याग केला. ही बाब विशेष कौतुकाचीच म्हणायची. सर्वसाधारणपणे सभात्यागादी कृत्ये विधिमंडळातील नाठाळ, गोंधळी आमदारांसाठी राखीव असतात. हे असे नाठाळ, गोंधळी लोकप्रतिनिधी विरोधी पक्षांखेरीज अन्य कोणाकडे असणार? सभात्यागावर त्यांचा अधिकार. तमिळनाडूचे महामहीम यानिमित्ताने विरोधी पक्षीयांशी हातमिळवते झाले. मुख्यमंत्री स्टालिन यांनी लिहून दिलेले भाषण त्यांस नामंजूर होते. जे मंजूर नाही ते वाचून दाखवण्यापेक्षा सभात्याग केलेला बरा असा विचार त्यांनी केला आणि बाणेदारपणे भर सभेतून ते चालते झाले. त्यांच्या तुलनेत आर्लेकर तसे मवाळ. गोव्याचे ते. शिवाय संघाचे. त्यामुळेही असेल; पण त्यांनी आपला बाणेदारपणा मंजूर नाही ते वाचनातून गाळण्यापुरताच मर्यादित ठेवला. रवी हे पोलीस अधिकारी होते. त्यामुळे आज्ञापालनाची सवय त्यांच्या रक्तात भिनलेली. हल्ली अनेक जण सेवेत असतानाच निवृत्त झाल्यावर कोणाच्या आज्ञा ऐकायच्या ते निश्चित करून आपली कारकीर्द त्याप्रमाणे बेततात. तसे त्यांनी केले असणार. त्यामुळे निवृत्तीनंतर ते महामहीम झाले आणि ज्यांनी राजभावनाचे वास्तव्य दिले त्यांच्या आज्ञा इमाने-इतबारे पाळू लागले.

त्याच इमानाचा भाग म्हणून त्यांनी मुख्यमंत्री स्टालिन यांच्या सरकारने तयार करून दिलेल्या भाषणातील वैगुण्ये दाखवून दिली. स्टालिन सरकार म्हणाले, तमिळनाडू हे गुंतवणुकीतील अग्रेसर राज्य. महामहीम म्हणाले, अजिबात नाही. तमिळनाडूची प्रगती नव्हे; अधोगती सुरू आहे. स्टालिन सरकार म्हणाले तमिळनाडूतील राहणीमान उंचावलेले आहे. महामहीम रवी म्हणाले..... छे, उलट ते खालावत चालले असून बायाबापड्यांस या राज्यांत आता सुरक्षित वाटेनासे झाले आहे. स्टालिन सरकार म्हणाले: या राज्यातील तरुण व्यापारउदिमात मोठ्या प्रमाणावर सहभागी होऊ लागला आहे.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात ग्रंथप्रदर्शन व काव्यवाचन



**बुलडाणा** : मराठी भाषेचा प्रचार व प्रसार होण्याच्या अनुषंगाने शासनाच्या धोरणानुसार दरवर्षी दि. १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे ग्रंथप्रदर्शन व काव्यवाचनाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर ग्रंथप्रदर्शनाचे उदघाटन जेष्ठ कवी,साहित्यीक श्री सर्जेराव चव्हाण आणि कवयित्री वैशाली तायडे यांचे हस्ते करण्यात आले. मराठी साहित्य वाचनानेच पुढील पीढीपर्यंत मराठी भाषा पोहचवण्याचे काम आपल्याला करावे लागेल असे मत सर्जेराव चव्हाण यांनी व्यक्त केले.

मराठी भाषेचा प्रचार व प्रसार होण्याकरीता प्रत्येकाने प्रमाणभाषेसह मराठी बोलीभाषांचा वापर दैनंदिन आयुष्यात केलाच पाहीजे असे मत कवयित्री वैशाली तायडे यांनी व्यक्त केले.

कवयित्री वैशाली तायडे यांनी आशयघन आणि दर्जेदार मराठी कविता सादर केल्या. सदर कार्यक्रमास वाचक, स्पर्धा परीक्षा विदयार्थी व मराठी भाषेवर प्रेम करणारे ग्रंथप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर ग्रंथप्रदर्शन सर्वांकरीता दिनांक 28 जानेवारी 2026 पर्यंत खुले असणार आहे. मराठी भाषेचा प्रचार व प्रसार आणि वाचनसंस्कृती वृदधींगत होण्याकरीता जास्तीतजास्त नागरीकांनी ग्रंथालयाचे सभासद व्हावे असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

# राष्ट्रध्वज सन्मान : आपले कर्तव्य आणि कायदेशिर जबाबदारी

२६ जानेवारी, २०२६ रोजी आपण प्रजासत्ताक दिन साजरा करत असताना, तिरंगा हा आपल्या राष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक म्हणून डौलाने फडकतो. मात्र, हा सन्मान टिकवून ठेवणे ही केवळ आपली नैतिक जबाबदारी नसून ते एक कायदेशीर बंधनही आहे. भारतीय संविधानाच्या कलम ५१ (अ) नुसार, राष्ट्रध्वजाचा आदर करणे हे प्रत्येक नागरिकाचे 'मूलभूत कर्तव्य' आहे.


कायदेशीर दायित्व आणि शिक्षा (LIABILITY)

'राष्ट्रीय सन्मानाचा अवमान प्रतिबंधक कायदा, १९७१' अंतर्गत राष्ट्रध्वजाचा अवमान करणे हा गंभीर गुन्हा आहे. खालील बाबी केल्यास तुमच्यावर कायदेशीर कारवाई होऊ शकते:

अयोग्य वापर: ध्वजाचा वापर गणवेश, रुमाल, उशी किंवा कंबरेच्या खालील कपड्यांवर करणे. चुकीचे प्रदर्शन: ध्वज जाणीवपूर्वक उलटा फडकवणे (केशरी रंग खाली असणे) किंवा तो जमिनीला/पाण्याला टेकू देणे. विद्रुपीकरण: ध्वजावर काहीही लिहिणे, तो फाडणे किंवा जाळणे. शिक्षा: या कायद्याचे उल्लंघन केल्यास ३ वर्षांपर्यंत कारावास किंवा दंड, किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. तसेच, दोषी व्यक्तीला पुढील ६ वर्षांसाठी निवडणूक लढवण्यास अपात्र ठरवले जाऊ शकते. नागरिकांचे कर्तव्य: २६ जानेवारीसाठी मार्गदर्शक तत्त्वे प्लास्टिक ध्वजाचा त्याग: प्लास्टिकचे ध्वज वापरू नका, कारण त्यांचा विल्हेवाट लावणे कठीण असते आणि ते रस्त्यावर पडल्यास ध्वजाचा अवमान होतो. सन्मानपूर्वक विल्हेवाट: जर ध्वज फाटला असेल किंवा खराब झाला असेल, तर तो रस्त्यावर न फेकता खासगीरित्या सन्मानपूर्वक जाळून किंवा जमिनीत पुरून त्याची विल्हेवाट लावावी. उंचीचा मान: राष्ट्रध्वज फडकवताना तो नेहमी उंच ठिकाणी आणि सन्मानाने फडकवावा.

**निष्कर्ष: तिरंगा हा आपल्या देशाचा मानबिंदू आहे. कायद्याचे**

अॅड. आशा महेश भागवत
मो.नं. : 9975524868



"Printed by Sanjay Pralhad Vinke Published by Gajanan Kisanrao Raut on behalf of Gajanan Kisanrao Raut and Printed at Printwell Offset , Keshav Nagar, Ghatpuri Road, Khamgaon and published from At.Post,Sutala BK, Tq. Khamgaon, Dist. Buldana Editor Gajanan Kisanrao Raut

पब्लिक कॉन्टॅक्ट हे साप्ताहिक मालक, संपादक, प्रकाशक गजानन किसनराव राऊत यांनी संजय प्रल्हाद विणके, मुद्रक यांच्या प्रिंटवेल आफ सेट, केशव नगर, घाटपुरी रोड, खामगांव ४४४३०३ येथे छापून सा. पब्लीक कॉन्टॅक्ट कार्यालय, मु.पो. सुटाळा बु. ता. खामगांव, जि. बुलडाणा येथे प्रसिध्द केले. या अंकातील सर्व लेखांशी संपादक सहमत असेलच असे नाही.पी. आर. बी. कायद्यानुसार वाद खामगांव न्यायालया अंतर्गत. RNI NO: MAHMAR/2022/84546

# गुंतवणूकदारांचे लक्ष चांदीकडे, बाजारात 'पांढरी' लाट ; हे आहे भाववाढीचे खरे कारण

मागील एका वर्षांपासून चांदीच्या दरात प्रचंड मोठी तेजीची लाट उसळत आहे. चांदीने गेल्या वर्षभरात आतापर्यंत एका वर्षातील सर्वाधिक परतावा दिल्यावर नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच 38 टक्केहून जास्त उसळी घेतली आहे. आदल्या दिवशी, गुरुवारी, चांदीच्या किमतीत घसरण झाली पण शुक्रवारी,या आठवड्याच्या शेवटच्या व्यापार दिवशी, सुरुवातीच्या व्यवहारात पुन्हा एकदा वधारली. या दरम्यान, एमसीएक्सवर इनसायडर ट्रेडिंगचे आरोप झाले आहेत.

चांदीत इनसायडर ट्रेडिंगचा आरोप



चांदीच्या किमती आंतरराष्ट्रीय बाजारात पहिल्यांदाच प्रति औंस 48.50 डॉलर्सच्या उसळल्या असून या महिन्यात आतापर्यंत चांदीच्या किमती 38% वाढल्या आहेत. या दरम्यान, ऑल इंडिया ज्वेलर्स अँड गोल्डस्मिथ्स फेडरेशन (AIJGF) ने अर्थमंत्र्यांना पत्र लिहून MCX वर चांदीच्या डेरिव्हेटिव्ह्ज करारांमध्ये इनसाइडर ट्रेडिंगचा आरोप केला असून चांदीवरील आयात शुल्क वाढवण्याच्या चर्चेदरम्यान नवीन प्रकरण उघडीस आलं आहे. 21 जानेवारी रोजी AIJGF ने अर्थमंत्र्यांना पत्र लिहून फ्युचर्स बाजारातील ट्रेडिंगवर आक्षेप घेतला. त्यावर दोन अधिकाऱ्यांनी - राष्ट्रीय अध्यक्ष पंकज अरोरा आणि राष्ट्रीय सरचिटणीस नितीन केडिया - स्वाक्षरी केली आहे. त्या दिवशी एमसीएक्सवरील चांदीचे करार प्रचलित बेंचमार्क/स्पॉट-लिंक्ड पॅरिटीपेक्षा अंदाजे 40000 रुपये प्रति किलो प्रीमियमने व्यवहार करत असल्याचा त्यांनी आरोप केला. बाजारात चांदीवरील आयात शुल्क वाढल्याच्या अफवांमुळे ही तीव्र आणि अचानक अव्यवस्था निर्माण झाली.

एमसीएक्सचा युक्तिवाद

मात्र, एमसीएक्सने आरोप फेटाळून लावले आणि आपल्याकडे एक मजबूत देखरेख प्रणाली व सर्व नियमांनुसार काम करते असल्याचा तर्क केला. एमसीएक्सच्या प्रवक्त्याने सांगितले की भू-राजकीय घटनांमुळे चांदीच्या बाजारात लक्षणीय अस्थिरता येत असून स्थानिक परिस्थितीसह या घटकांचा स्थानिक बाजारपेठेवर परिणाम झाला. एमसीएक्सच्या किमती चलनातील चढउतार, शुल्क आणि स्थानिक बाजारातील हालचालींपासून बचाव करतात.

आदल्या दिवशी, गुरुवारी, सुरुवातीच्या व्यवहारात चांदी आणि सोन्याचे ईटीएफ जवळजवळ 20% कोसळले पण, दिवसाच्या शेवटी पडझड काही प्रमाणात सावरली जवळपास 11% पर्यंत कमी झाली. एमसीएक्सवर मार्च डिलिव्हरीसाठी चांदीचे करार 2.7%, तर फेब्रुवारी डिलिव्हरीसाठी सोन्याचे करार 0.8% घसरले.

## कास्तकारांनी ३१ जानेवारीपर्यंत कागदपत्रे सादर न केल्यास अनुदान मिळणार नाही

**खामगाव** : खामगाव तालुक्यात सप्टेंबर–ऑक्टोबर २०२५ दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतीपिकांसाठी शासनामार्फत DBT (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर) योजनेअंतर्गत आधार क्रमांक संलग्न (Seeding Link) बँक खात्यांमध्ये थेट अनुदानाची रक्कम जमा करण्यात आली आहे.अनुदान वाटप प्रक्रियेदरम्यान दि. ११ ऑक्टोबर २०२५ रोजी जाहीर सूचना देऊन ग्रामपातळीवर कास्तकारांच्या यादीचे चावडी वाचन करण्यात आले. तसेच वारंवार ग्रामपातळीवर प्रसिद्धी देण्यात आली असतानाही अनेक कास्तकारांनी आधार व बँक खात्यांशी संबंधित आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर केली नाहीत. त्यामुळे पुनश्च दिनांक २९ ऑक्टोबर २०२५ रोजी गावातील व्हॉट्सॲप गट, चावडी वाचन व ग्रामपंचायत कार्यालयात प्रसिद्धी देत दिनांक ०५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत खाते तपशील सादर करण्याबाबत तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहाय्यकांना सूचना देण्यात आल्या होत्या. तरीदेखील अद्याप अनेक कास्तकारांची खाती प्रलंबित आहेत. त्यामुळे उर्वरित सर्व कास्तकारांना (मयत कास्तकारांचे वारस, सामूहिक खाती, बाहेरगावी राहणारे कास्तकार आदी) अंतिम सूचना देण्यात येत असून, त्यांनी दिनांक ३१ जानेवारी २०२६ पर्यंत आपल्या गावातील नियुक्त तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहाय्यक यांच्याकडे आवश्यक कागदपत्रे सादर करून V.K. No. प्राप्त करून घ्यावा, असे आवाहन तहसीलदार खामगाव यांच्यामार्फत करण्यात आले आहे.मुदतीनंतर कोणतीही तक्रार स्वीकारली जाणार नाही तसेच त्यानंतर खाते सादर केल्यास अनुदान देणे शक्य होणार नाही, याची सर्व कास्तकारांनी नोंद घ्यावी, असेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## ग्रामीण डाक जीवन विमा पुनर्जीवित करण्याची संधी

**बुलडाणा** : : भारतीय डाक विभागामार्फत डाक जीवन विमा व ग्रामीण डाक जीवन विमा या योजना नागरिकांना विमा-सुरक्षा देण्यासाठी राबविण्यात येतात. मात्र, काही विमाधारकांनी नियमित हप्ता न भरल्यामुळे त्यांच्या विमा बंद पडलेल्या आहेत. अशा बंद पडलेल्या विमा पुनर्जीवन करण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात येत असून पुनर्जीवित करण्यात येणाऱ्या विमा पॉलिसींवरील दंडामध्ये सूट देण्यात येणार आहे.

शेतकरी बंधूंनो ...
शेतमालाला जास्त भाव पाहिजे?



तर मग जरूर आपले सोयाबीन, गहू, ज्वारी, मूंग, उडीद चना क्लिनिंग करा







गजानन ॲग्रो इंडस्ट्रीज
धान्य क्लिनिंग प्लांट व दालमिल
प्लॉट नं. A/86, M.I.D.C. खामगाव जि. बुलडाणा
9422200095, 9422180819

# लाडकी बहीण योजनेतील अपात्र अन्यायाविरोधात ओबीसी जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांचा एल्गार

**खामगाव** : राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत ई-केवायसी प्रक्रियेत झालेल्या गंभीर तांत्रिक त्रुटींमुळे खामगाव शहरातील अनेक पात्र महिलांचे अनुदान अचानक बंद झाल्याचा प्रकार समोर आला असून, यामुळे शेतमजूर व हातमजूर महिलांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने नोव्हेंबर महिन्याचा हप्ता न मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर दि. ११ जानेवारी २०२६ रोजी खामगाव येथे लाडकी बहीण योजना मार्गदर्शन कॅम्प ओबीसी महासंघातर्फे आयोजित करण्यात आला होता.

या कॅम्पदरम्यान अनेक महिलांची ई-केवायसी करताना



चुकीची नोंद झाल्याचे निदर्शनास आले. काही महिलांनी मोबाईलद्वारे ई-केवायसी करण्याचा प्रयत्न केला असता, तांत्रिक अडचणींमुळे त्यांचा थेट योजनेतील लाभ बंद झाल्याचे स्पष्ट झाले.विशेष म्हणजे, लाडकी बहीण योजनेची अधिकृत वेबसाईट तसेच नारीशक्ती ॲपवर सध्या ई-केवायसी प्रक्रिया बंद असल्याने पुनश्च केवायसी करण्याचा कोणताही पर्याय उपलब्ध नाही. परिणामी, पूर्णतः पात्र असूनही अनेक गरीब व मजूर महिलांना अपात्र ठरविण्यात आले आहे.

काही प्रकरणांमध्ये तर मजूर महिलांना सरकारी कर्मचारी असल्याचे सिस्टीमवर दर्शविले जात असून, हा प्रकार अत्यंत गंभीर असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.या सर्व महिलांनी प्रतिज्ञापत्राद्वारे आपण योजनेस पात्र असल्याचे नमूद केले असून, त्यांची सविस्तर यादी जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आली आहे. भविष्यात यावर कोणतीही ठोस कारवाई न झाल्यास महिलांमध्ये शासनाविरोधात तीव्र असंतोष निर्माण होऊ शकतो .दरम्यान,या अन्यायाविरोधात राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष गणेश जगन्नाथ चौकसे व युवा जिल्हाध्यक्ष सूरज बेलोकार यांच्या नेतृत्वाखाली शेकडो महिलांनी खामगाव येथून बुलडाणाकडे मोर्चा काढत जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. जिजामाता प्रेक्षागार मैदानापासून निघालेल्या या मोर्चात महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

या संदर्भात जिल्हाधिकारी यांनी स्वतः लक्ष घालून वरिष्ठ स्तरावर तातडीने पत्रव्यवहार करावा, अपात्र ठरविण्यात आलेल्या पात्र महिलांची पुनश्च ई-केवायसी करून थकीत तसेच पुढील हप्ते त्वरित सुरू करावेत, अशी ठाम मागणी जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे व ओबीसी महासंघाच्या वतीने करण्यात आली आहे. अन्यथा नाईलाजास्तव जिल्हाधिकारी कार्यालया समोर आमरण उपोषण व धरणे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.यावेळी सावळे , राहुल सावळे , अनंता जाधव , संदीप सावळे , सुरज बेलोकार , दीपक महाजन , प्रकाश घाडगे , मेजर सुभाष फेरंग , शेख हुसेन , प्रमोद जावडेकर यांच्यासह अनेक ओबीसी बांधव

## नेसले गर्ल सिया संचित नावंदर



**खामगाव** : कॉफी तसेच इतर लहान मुलांच्या खाण्यायोग्य असलेली उत्पादने बनविणाऱ्या जगप्रसिध्द नेसले Nestlé कंपनीच्या एका Nestlé CEREGROW उत्पादनाच्या जाहीरात खामगावच्या सिया संचित नावंदर या मुलीने काम केले आहे. **व्हीडीओसाठी लिंक.**

Assurance of Dense Nutrition | Nestlé CEREGROW

## प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत जिल्ह्यात हप्ते वितरण सुरळीत

**बुलडाणा** : केंद्रशासन स्तरावरून देशामध्ये निधी वितरणाच्या प्रणालीमध्ये सुधारणा करून नवीन एसएनए-स्पर्श प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रणालीअंतर्गत लाभार्थ्यांना अनुदानाचे हप्ते वितरीत करण्याची कार्यवाही पंचायत समिती स्तरावरून सुरू करण्यात आली असून ती सुरळीतपणे सुरू आहे.

बुलढाणा जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा 2.0 अंतर्गत सन 2024-25 व 2025-26 या कालावधीसाठी 1 लाख 3 हजार 456 लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी आतापर्यंत 90 हजार 114 लाभार्थ्यांना पहिला हप्ता, 33 हजार 202 लाभार्थ्यांना दुसरा हप्ता, तर 19 हजार 398 लाभार्थ्यांना तिसरा हप्ता पंचायत समिती स्तरावरून वितरीत करण्यात आला आहे. उर्वरित लाभार्थ्यांना देखील टप्प्याटप्प्याने हप्ते वितरणाची कार्यवाही सुरू आहे.

## ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व नामसंकीर्तन सोहळा

**खामगाव** : मागील 28 वर्षापासून विठ्ठल नगर खामगाव येथे ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा सुरू असून यावर्षी सुद्धा दिनांक 25 जानेवारीपासून सुरू होणार आहे. ह भ प काशिनाथ महाराज फोकमारे आळंदी यांच्या व्यासपीठ नेतृत्वात हा सोहळा पार पडणार आहे तरी सर्व भाविकांनी या सोहळ्यात सहभागी व्हावे असे आवाहन विठ्ठल मंदिर संस्थान, विठ्ठल नगर जलंब रोड खामगाव यांनी केले आहे.

या सोहळ्यामध्ये सुप्रसिद्ध अशा कीर्तनकारांचे कीर्तनाचा लाभ मिळणार आहे यामध्ये हभप प्रभाकर महाराज पाटील मलकापूर विठ्ठल महाराज देशमुख रिसोड प्रकाश महाराज जंवजाळ चिखली, गोपाळ महाराज पाटील उरळ संदीप महाराज गिऱ्हे व्याळा



,उमेश महाराज भाकरे आळंदी, राम महाराज डोंगरे जाट नांदूर यांचे कीर्तन ऐकण्याचा योग आहे. तसेच दिनांक 31 जानेवारी रोजी दुपारी तीन ते सहा पालखी आणि दिंडी सोहळा राहणार आहे. ह भ प राम महाराज डोंगरे यांचे काल्याचे किर्तन हे दिनांक एक फेब्रुवारी रोजी होणार असून दुपारी महाप्रसादाचा कार्यक्रम राहणार आहे.

तरी पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व नाम संकीर्तन सोहळ्याचा आनंद घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## घरातील फिश टँकमधील मासे मरत आहेत, 'ही' आहेत त्यामागची संकेत जाणून घ्या

घरातील फिश टँकमधील मासे अचानक मरत असतील तर ही बाब दुर्लक्षित करू नका. बहुतांश वेळा काही सामान्य चुका किंवा संकेतांकडे लक्ष न दिल्यामुळेच ही समस्या निर्माण होते. फिश टँकमधील मासे मरण्यामागची कारणे आणि अशा वेळी काय करावे, हे 8 महत्त्वाच्या मुद्द्यांमधून जाणून घ्या.

### पाण्याची खराब गुणवत्ता

टँकमधील पाणी वेळेवर न बदलल्यास अमोनिया, नायट्राइटसारखे घातक घटक वाढतात. यामुळे माशांना श्वास घेण्यास त्रास होतो.यासाठी आठवड्यातून किमान एकदा 20–30% पाणी बदला.

### ऑक्सिजनची कमतरता

टँकमध्ये एअर पंप नसल्यास किंवा तो नीट काम करत नसल्यास माशांचा जीव धोक्यात येतो.एअर पंप सतत सुरू ठेवा आणि बबल्स येत आहेत का ते तपासा.

### जास्त अन्न देणे

जास्त अन्न दिल्यास उरलेले अन्न पाण्यात सडते आणि पाणी विषारी बनते.माशांना दिवसातून 1–2 वेळाच आणि



मर्यादित प्रमाणात अन्न द्या.

### टँक जास्त भरलेला असणे

लहान टँकमध्ये खूप मासे ठेवल्यास ऑक्सिजन कमी पडतो आणि तणाव वाढतो.टँकच्या आकारानुसार माशांची संख्या ठेवा.

### तापमानातील अचानक बदल

गरम किंवा खूप थंड पाणी माशांसाठी घातक ठरते. यासाठी टँकचे तापमान स्थिर ठेवा आणि अचानक पाणी बदलू नका.

### फिल्टर नीट काम न करणे

फिल्टर बंद किंवा घाणेरडा असल्यास पाणी शुद्ध राहत नाही. यासाठी फिल्टर नियमित स्वच्छ करा आणि सतत चालू ठेवा.